# वर्धा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**दिनांक : 28.11.2018**

## खुनाचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेकडुन उघड

दि.22.10.2018 रोजी श्रीमती नलिनी कदम, रा. गजानन नगर, वार्ड नं. 1, वर्धा यांनी पोलीस स्टेशनला फिर्यादी दिली की, तीचा मुलगा नामे पुरुषोत्तम उर्फ गुड्डु बाबाराव कदम, वय 37 वर्ष हा दिनांक 09.10.2018 रोजी पासुन घरी आलेला नाही. त्यावरुन पोलीस स्टेशन, रामनगर येथे सदर इसम हरविल्याची नोंद करण्यात आली व सदर हरविलेल्या इसमाचा शोध घेणे सुरु केले.

मा. पोलीस अधीक्षक साहेब यांच्या सुचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेकडुन सुध्दा सदर इसमाचा समांतर शोध सुरु होता. सदर हरविलेल्या इसमाचे शोध मोहिम दरम्यान गोपनिय माहिती मिळाली की, गुड्डु कदम याचे त्याचेच घराजवळील एका महिलेसोबत अनैतिक संबंध होते व दिनांक 09.10.2018 रोजी सदर महिला ही तिचे माहेरी चंद्रपुर येथे गेल्याचे तसेच गुड्डु कदम हा सुध्दा तिच्या सोबत गेलाचे समजले.

दिनांक 27.11.2018 रोजी सदर महिला हिला हरविलेल्या इसमाचे चौकशीकामी बोलविण्यात आले होते. सतत पाच तास चौकशी करुन तिला विश्वासात घेवून विचारपूस करण्यात आली असता तिने सांगितले की, गुड्डु व मी दिनांक 09.11.2018 रोजी चंद्रपुरला सोबत गेलो होतो. तेथे बल्लारशा रेल्वे स्टेशनवर आम्हास घेण्याकरीता माझे वडीलांच्या गाडीवरील ड्रायव्हर नामे सुरज रामभाउ आत्राम, रा. लालपेठ कॉलरी हा आला होता. त्यानंतर तो आम्हास घेवून त्याचे घरी गेला तेथे संध्याकाळी जेवण केल्यानंतर सुरज आत्राम याने मला घरी सोडुन दिले व तेथे दोघे सोबत राहीले. सकाळी सुरज यास मी गुड्डू कुठे आहे असे विचारले असता त्याने मला सांगितले की, त्याला मी मारुन टाकले आहे, तु आता लक्ष देवू नको. त्यामुळे मी घाबरुन जावून वर्धा येथे परत आली व घाबरुन जावून घडलेली घटना कुणासही सांगितली नाही.

मिळालेल्या माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी व कर्मचारी हे चंद्रपुर येथे गेले व तेथे सुरज आत्राम यास ताब्यात घेवून त्याची कसुन चौकशी केली असता त्याने गुड्डू उर्फ पुरुषोत्तम याचा खुन केल्याचे कबुल केले. सुरज आत्राम याने सांगितले की, दिनांक 09.10.2018 रोजी गुड्डू व मी घरी जेवण केल्यानंतर माझी मानलेली बहिन हिला मी तिचे घरी सोडुन दिले व आम्ही दोघे माझे घरी झोपलो. त्यानंतर मी सकाळी 0.5.30 वाजता उठलो व गुड्डू यास सुध्दा उठविले व गुड्डू यास आपल्याला दारु प्यायला जायचे आहे असे सांगुन बाजुच्या जंगलात घेवून गेलो तेथे आम्ही दोघांनीही दारु प्राशन केली व त्यानंतर माझ्याजवळ असलेल्या मोटारसायकलच्या क्लचवायरने गुड्डू याचा गळा आवळुन दोन मोठे दगड टाकले व गुड्डूचा खुन केला. त्यानंतर बाजुच्या पंपावरुन 1 लिटर पेट्रोल आणुन त्याचा मृतदेह जाळुन टाकला.

गुड्डू व माझी मानलेली बहिन सरिता नांदुरकर हिचे सोबत अनैतिक संबंध होते तसेच गुड्डू हा तिला नेहमी मारहाण व शिवीगाळ करीता होता. तसेच अंदाजे दोन महिने अगोदर मी वर्धा येथे आलो असता गुड्डू याने माझ्यासोबत सुध्दा वादविवाद करुन माझा अपमान केला होता. त्यामुळे मी त्याचा काटा काढायचा मनात ठरवून त्याचा खुन केला आहे.

आरोपी सुरज आत्राम याचे सांगनेप्रमाणे मृतक गुड्डू याचा जळालेला मृतदेह ताब्यात घेण्यात आला व घटनास्थळ हे चंद्रपुर येथील असल्याने तेथे गुन्हा दाखल करुन पुढील कार्यवाही करण्यात आली. सदर प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम करुन घेवून सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणला असुन पुढील तपास सुरु आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली व सध्याचे प्रभारी पोलीस अधीक्षक श्री निखील पिंगळे, पोलीस निरीक्षक श्री निलेश ब्राम्हणे तसेच पोलीस उपनिरीक्षक महेंद्र इंगळे, श्री आशिष मोरखडे यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन व हजेरीत पोलीस स्टाफ सफौ/नामदेव किटे, पोहवा/सलाम कुरेशी, नरेंद्र डहाके, हरिदास काकड, नापोशि/वैभव कट्टोजवार, अमित शुक्ला, कुलदिप टांकसाळे, पोशि/सचिन खैरकार, भुषण पुरी, मपोशि/जोत्स्ना शेळके, संचाली मुंगूले सर्व नेमणुक स्था.गु.शा. वर्धा यांनी केली.